# चंद्रपूर जिल्हयातील आदिवासी शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्या

संशोधक
**हरिष एम. बावनगडे**
bawangadeharish@gmail.com
Mob. No. 9075947905

---

**प्रस्तावना –**

जगात सर्व देशात निरनिराळया प्रदेशात आदिवासी समुहाची वस्ती आहे. विशेषतः आशिया, आफ्रिका आणि अमेरिका हया खंडातील देशात आजही आदिवासी जमात मोठया प्रमाणात आढळते. परंतू आधूनिक काळातही प्राथमिक अवस्थेतील जीवन जगणाऱ्या रहिवाशांचे प्रमाण जितके आफ्रीका खंडात आहे, तितके अन्यत्र कोठेही नाही.

हया जमातीला काही विचारवंतांनी, अभ्यासकांनी व सामाजीक कार्यकर्त्यांनी विविध नावे दिली आहेत. या लोकांना अगदी प्राचिण किंवा अगदी मुळचे आदिवासी म्हटले जाते.

**1962 मध्ये शिलांग येथे भरलेल्या आदिवासी परिषदेत 'आदिवासी' या शब्दांची व्याख्या करण्यात आली.**

**व्याख्या -**

''एका समान भाषेचा वापर करणाऱ्या एकाच पुर्वजापासून उत्पत्ती सांगणारा. एका विशिष्ट भुप्रदेशावर वास्तव करणाऱ्या तंत्र शास्त्रीय दृष्टीने मागासलेला, अक्षर ओळख नसलेला व रक्त संबंधावर आधारित सामाजीक व राजकीय रितीरिवाजांचे प्रामाणीकपणे चलन करणाऱ्या एकजिन्सी गटाला आदिवासी समाज असे म्हणतात.

**महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्या आदिवासी लोकसंख्या**

| अ.क्र. | जनगणना वर्ष | राज्याची एकूण लोकसंख्या | आदिवासी लोकसंख्या |
|---|---|---|---|
| 1 | 1971 | 504.12 | 38.41 |
| 2 | 1981 | 627.84 | 57.12 |
| 3 | 1991 | 789.37 | 73.18 |
| 4 | 2001 | 968.79 | 85.77 |
| 5 | 2011 | 987.80 | 87.68 |

**जिल्हा निहाय लोकसंख्या**

**अमरावती विभाग**

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | लोकसंख्या (लाखात) | प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | वर्धा | 1237 | 11.45 |
| 2 | नागपूर | 4068 | 10.91 |
| 3 | भंडारा | 1136 | 8.60 |
| 4 | गोंदिया | 1201 | 16.32 |
| 5 | चंद्रपूर | 2071 | 18.11 |
| 6 | गडचिरोली | 970 | 38.35 |

Research Hub International Journal

**आदिवासींच्या शेती विकासासाठी आवश्यक तत्वे -**

1. चंद्रपूर जिल्हयातील आदिवासींचे कृषी हे अल्पकृषी भुधारक आहेत. त्यामुळे हया भुधारकांनी विकास योजनेची तत्वे स्विकारली पाहिजे.
2. शेती सुधारण्याच्या कार्यक्रमात जलसिंचनाला अग्रक्रमण देने आवश्यक आहे. त्यासाठी शासनाने सिंचनाची साधने आदिवासी भुधारकांना उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.
3. कमी दर्जाची शेती असल्यामुळे आदिवासी आपल्या कृषीमध्ये सोयाबीन मूग, धान, यासारखे हलके धान्य विकवित असून अधिक धान्य पिकविण्याच्या दृष्टीने संशोधन करून हलक्या प्रतिच्या धान्याच्या संकरित जाती उत्पादन करणे आवश्यक आहे.
4. आदिवासी शेती सुधारणेची प्रक्रिया ही सतत चालणारी आहे. याकरिता तरूण व सुशिक्षित बेरोजगारांना शेती संबंधी प्रषिक्षण देणे गरजेचे आहे.
5. आदिवासींच्या आर्थिक समस्येमध्ये बेकारी दिवसेंदिवस वाढत आहे. त्यावर मात करण्यासाठी शेतीत भरपूर उत्पन्न काढण्याच्या दृष्टीने यंत्र सामुग्री व अनुदानाची व्यवस्था केल्यास शेती विकास व आर्थिक विकास लवकर होऊ शकतो.

**संशोधनाची उद्दीष्टे -**

1. उत्पन्न कमी असण्याची कारणे.
2. आर्थिक समस्यांची कारणे

**भुधारक -**

2011 च्या कृषी गणनेच्या माहितीनुसार जिल्हयात एकूण 304227 भुधारक असून त्यांच्या जवळील एकूण शेत जमिन 540914.6 हेक्टर आहे. यापैकी 2.7 टक्के धारण क्षेत्र (0.5) हेक्टर खाली 8.9 टक्के धारण क्षेत्र (0.5 ते 1) हेक्टर खाली 25.7 टक्के धारण क्षेत्र (1 ते 2) हेक्टर खाली 42.7 टक्के धारण क्षेत्र (2 ते 5) हेक्टर खाली 16.1 टक्के धारण क्षेत्र (5 ते 10) हेक्टरखाली 3.1 टक्के धारण क्षेत्र (10 ते 20) हेक्टरखाली तर 20टक्के व त्यापेक्षा अधिक धारण क्षेत्र 0.8 टक्के आहे.

**पीक पद्धती -**

2011-12 मध्ये एकूण पिकाखाली असणाऱ्या 520877 हेक्टर क्षेत्रापैकी अन्नधान्य पिकाखाली 251775 हेक्टर म्हणजो एकूण पिकाखालील क्षेत्राच्या 48.3 टक्के आहे. धान्य पिकापैकी सर्वात जास्त क्षेत्र तांदुळ या पिकाखाली क्षेत्राच्या 31.9टक्के आहे.

**रासायनिक खताचे वाटप -**

चंद्रपूर जिल्हयात 120888 मे. टन रासायनिक खताचे वाटप करण्यात येते.

**वनक्षेत्र** –

जिल्हयात वनक्षेत्र 3600.6 चौ. की. मी. क्षेत्र असून जिल्हयाच्या क्षेत्राकाळाशी त्यांचे प्रमाण 31.05 टक्के इतके आहे.

Research Hub International Journal

**साक्षरता –**

2011 च्या जनगननेनुसार एकूण लोकसंख्या 80.00 टक्के लोकसंख्या साक्षर असून ग्रामीण भागातील साक्षरतेचे प्रमाण 25.5 टक्के तर नागरी भागातील 88.2 टक्के आहे. पुरूष व स्त्रिया साक्षरतेची टक्केवारी अनुक्रमे 86.8 टक्के आणि 73.0 टक्के आहे.

**पाणी पुरवठा -**

जिल्हयात मोठे तलाव नाहीत अने मध्यम तलाव आहेत.

**जमिनीचा प्रकार -**

जिल्हयात जमिनीचे विविध प्रकार असून ती काळी रेताळ बरजी आणि पांढरी आहे.

**चंद्रपूर जिल्हयातील आदिवासी शेतकऱ्यांच्या समस्या -**

1. साक्षरतेचे प्रमाण कमी
2. व्यसनाधिनतेचे प्रमाण जास्त
3. शेतीला पाणीपुरवठयाचे प्रमाण कमी
4. शेतीचा आकार कमी
5. मजूरांचा प्रश्न
6. रासायनिक खताचे बियाने व किटक नाशकांचा किंमती
7. दळणवळणाच्या सोयीचा अभाव
8. वन्य जीवापासून नुकसान
9. हलक्या दर्जाच्या शेती

हया सर्व समस्या असल्यामुळे चंद्रपूर जिल्हयातील आदिवासी शेतकरी आपला विकास व जिवनमान उंचावू शकत नसल्यामुळे त्यांना विविध प्रकारच्या समस्यांना तोंड दयावे लागते.

**निष्कर्ष -**

या सर्व अभ्यासावरून असे लक्षात येते की, चंद्रपूर जिल्हयातील आदिवासी शेतकरी आजही आर्थिक समस्यांचा सामना करतांनी दिसतो आहे. म्हणून आदिवासी शेतकरी आपल्या परिवारांचा विकास करण्यास सक्षम नाही. म्हणून आदिवासी शेतकरी दारिद्रयात जीवन जगतांनी दिसतो आहे. अशा विविध आर्थिक समस्या आहेत.

**संदर्भ -**


- राजूरकर अ.जा., 1982, चंद्रपूर जिल्हयाचा इतिहास, महाकाली प्रकाशन, चंद्रपूर
- राऊत वर्षा, 1985, चंद्रपूर जिल्हा विशेष, मृणाली प्रकाशन, नागपूर
- आर्थिक सामाजीक समालोचण, चंद्रपूर जिल्हा महाराष्ट्र शासन, वर्ष 2020
- आर्थिक सामाजीक समालोचण, चंद्रपूर जिल्हा महाराष्ट्र शासन, वर्ष 2011.


Research Hub International Journal